


UNITE FOR GOOD

# अजिंठा

फेब्रुवारी- २०२६ ● अंक- ८ वा

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| आर.आय.प्रेसिडेंट<br>रो.फ्रान्सिस्को अरेइझो | डिस्ट्रीक्ट गव्हर्नर<br>रो.ज्ञानेश्वर शेवाळे | प्रेसीडेंट<br>रो.गिरीश कुलकर्णी | ऑन.सेक्रेटरी<br>रो.सुभाष अमळनेरकर | बुले.कमिटी चेअरमन<br>रो.कॅ.मोहन कुलकर्णी |

Rotary | UNITE FOR GOOD

ROTARY CLUB JALGAON

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26

Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

या आपल्या अजिंठाच्या आठव्या अंकात आपले स्वागत करतांना विशेष आनंद होत आहे. फेब्रुवारी महिना म्हणजे 'पीस बिल्डींग अॅन्ड कॉन्फ्लिक्ट प्रिव्हेन्शन' म्हणजेच 'शांतता-संघर्ष निवारण' या विषयावर केंद्रीत केलेला महिना. या विषयावर या अंकात आपणास अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांचा अभ्यासपूर्ण लेख वाचायला मिळेल. याच महिन्यात आपण ६ तारखेला आपल्या क्लबचा चार्टर डे साजरा करीत आहोत. अजूनही अनेक चांगले चांगले प्रोजेक्टस् आणि चांगले वक्ते आपल्या साप्ताहिक सभांसाठी या महिन्यात आपण बोलावणार आहोत.

मागच्या जानेवारी महिन्यात आपण बघितलंच कशा प्रकारे उत्कृष्टपणे आपण आपल्या साप्ताहिक सभा आणि विविध प्रोजेक्टस् साजरे केलेत. त्याचा सविस्तर वृत्तांत आणि इतरही नेहमीचे लेख आपणांस या अंकात वाचायला मिळतीलच. आपल्या रोटरी डिस्ट्रिक्टच्या हिशोबाने महत्त्वाची घटना म्हणजे गोवा येथे झालेली रोटरीची डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स. या कॉन्फरन्सला आपल्या क्लबच्या ६२ सदस्यांनी हजेरी लावली होती हे एक रेकॉर्डच म्हणावे लागेल. कॉन्फरन्समुळे आपल्याला इतर व्यक्तींच्या संपर्कात यायला मदत होते. त्यांचे महान कार्य जवळून पहायची संधी मिळते. तसेच कॉन्फरन्सला आलेल्या वक्त्यांचे विचार आणि कार्य पाहून आपल्याला त्याची माहिती मिळते व असेच महान कार्य करण्याची ऊर्जा मिळते. रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांची नुकतीच २७ जानेवारीला पुण्यतिथी झाली. ते नेहमी म्हणत, Sucess is not measured by wealth, but by the positive impact you have on others! या उक्तीप्रमाणे आपण नेहमी असेच काम करूया की ज्यामुळे इतरांवर त्याचा सकारात्मक प्रभाव पडेल आणि या वर्षीच्या घोषवाक्याप्रमाणे 'UNITE FOR GOOD' एकत्र येऊन रोटरीच्या माध्यमातून विश्वशांतीचा संदेश सर्वत्र देऊया. धन्यवाद!

**- रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

रोटरी वर्षातील सर्वात उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी सोहळा म्हणजे डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स. दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी गोवा येथे पार पडलेल्या या कॉन्फरन्समध्ये आपल्या क्लबमधून ६२ सदस्यांचा सहभाग ही निश्चितच अभिमानाची बाब ठरली. उत्कृष्ट वक्ते, नियोजनबद्ध भोजन व्यवस्था, आदरातिथ्य, मैत्रीपूर्ण वातावरण आणि आपुलकीचे ऋणानुबंध या साऱ्यांमुळे ही कॉन्फरन्स आपल्या सर्वांच्या स्मरणात राहणारी ठरली. रोटरी म्हणजे केवळ सेवा नव्हे, तर मैत्री आणि सौहार्द यांचे सुंदर नाते आहे, याची प्रचिती या निमित्ताने आली.

या महिन्यात आपण आरसीसी क्लबची स्थापना करून रोटरी कुटुंब अधिक विस्तारले. आरसीसीच्या माध्यमातून आयोजित टिफिन रेसिपी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. Vocational Month च्या निमित्ताने Vocational Service Award प्रदान करून विविध क्षेत्रातील सेवाभावी योगदान करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. तसेच AI तंत्रज्ञान समजावून सांगणारी कार्यशाळा आणि आपल्या ज्येष्ठ सदस्य पी.पी.रो. प्रेम कोगटा यांच्या अत्याधुनिक फॅक्टरीला (दालमिल) दिलेली भेट हे उपक्रम ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरले.

रोटरी वर्षातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेली डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांची ऑफिशिअल क्लब व्हिजिट दिनांक २७ फेब्रुवारी रोजी निश्चित झाली आहे. या भेटीदरम्यान आपण आतापर्यंत केलेल्या सर्व उपक्रमांचा लेखाजोखा सादर करणार असून, आपल्या क्लबचे वेगळेपण, कार्यपद्धती आणि सामाजिक प्रभाव अधोरेखित करण्याची ही महत्त्वाची संधी आहे.

फेब्रुवारी महिना Peace Building and Conflict Prevention Month म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने एक विशेष सभा व समाजोपयोगी प्रकल्प राबविण्याचा मानस आहे. तसेच भारत सरकार सादर करीत असलेल्या अर्थसंकल्पावर आधारित ज्येष्ठ चार्टर्ड अकाऊंटंट श्रीराम देशपांडे यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, ज्याचा सर्वांना निश्चितच लाभ होईल.

मित्रहो, या अद्भुत रोटरी प्रवासात पुढे जाताना आपल्या सततच्या सक्रीय सहभागाची अपेक्षा आहे. उर्वरित काळात अधिक जोमाने, एकत्र येऊन हे रोटरी वर्ष अधिक फलदायी, अर्थपूर्ण आणि संस्मरणीय करूया.

"Unite For Good"

**- रो.गिरीश कुलकर्णी**

## साप्ताहिक सभा

# जानेवारी महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ दि. २ जानेवारी–** दि.१ जानेवारी रोजी रो.सुबोध सराफ व रो.डॉ.शमा सराफ यांचा सुपुत्र अर्णव याचे अमेरिकेत दु:खद निधन झाले. त्या प्रित्यर्थ नियमित साप्ताहिक सभा न घेता सराफ कुटुंबियांच्या प्रति सहवेदना प्रकट करण्याच्या हेतूने शोक सभा आयोजित केली होती.

---

**✻ दि.९ जानेवारी –** या सभेत ‘व्होकेशनल मंथ’ च्या निमित्ताने व्होकेशन एक्सलन्स व लिडरशिप ॲवॉर्डस् शहरातील विविध मान्यवरांना प्रदान करण्यात आले. या प्रसंगी पिपल्स् बँकेचे माजी अध्यक्ष श्री.भालचंद्र पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अध्यक्षा मिनल करनवाल, डॉ.गिरीश सहस्त्रबुद्धे, डॉ.अर्पणा भट–कासार, जयदीप पाटील, विजय डोहोळे, अनिल जोशी, शंकर जावळे, हर्षाली चौधरी, मनिष चिरमाडे, किरण महाजन इ.मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रास्ताविक रो.राजेश वेद यांनी केले तर सूत्र संचालन रो.स्वाती ढाके यांनी केले. व्यासपीठावर अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे यांची उपस्थिती होती. आभार डॉ.महेश पाटील यांनी मानले.





**✻ दि. १६ जानेवारी –** या साप्ताहिक सभेत आतापर्यंत झालेल्या ‘मेडीकल कॅम्प’ मध्ये मदत करणाऱ्या डॉक्टर्सचा तसेच सपोर्ट स्टाफचा सत्कार सभेसाठी लाभलेले प्रमुख पाहुणे मा.श्री.अशोकभाऊ जैन, अध्यक्ष जैन उद्योग समूह जळगाव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मेडीकल कमिटी चेअरमन रो.डॉ.जयंत जहागीरदार यांचाही सत्कार करण्यात आला.

**✻ दि. २३ जानेवारी –** बहुतांश सदस्य गोवा येथील डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्सला गेले असल्याने या दिवशीची साप्ताहिक सभा रद्द करण्यात आली होती.

**✻ दि.३० जानेवारी –** या साप्ताहिक सभेचा विषय होता. ‘इम्प्रेशन्स’ यात काही सदस्यांनी गोवा येथे पार पडलेल्या डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स बद्दल आपापले मत मांडले. यावेळी ही सभा क्लबचे वरीष्ठ सदस्य पी.पी.रो.प्रेम कोगटा यांच्या एम.आय.डी.सी. मधील कोगटा इम्पोर्ट एक्सपोर्ट या एशियातील अग्रगण्य दाल मिल मध्ये आयोजित केली होती. तसेच यावेळी सर्व सदस्यांना ही फॅक्टरी दाखविण्यात आली.



# प्रोजेक्ट

# जानेवारी महिन्यातील प्रोजेक्ट




**✲ दि. ६ जानेवारी –** रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘पीस वॉक’ चा प्रोजेक्ट जैन हिल्स च्या निसर्गरम्य वातावरणात सकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला. सकाळच्या या शांत प्रहरी एकत्रित चालण्याने पर्यावरणाशी एकरूप होता आले आणि त्यामुळे अधिक मानसिक दृढता प्राप्त झाली, अशी प्रतिक्रिया यात सहभागी झालेल्या आपल्या क्लबच्या अनेक सदस्यांनी दिली. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांच्या पुढाकाराने हा प्रोजेक्ट यशस्वी झाला.

**✲ दि. १० जानेवारी –** एआय कार्यशाळा– आपल्या क्लब तर्फे गोदावरी इंजिनिअरींग कॉलेज येथे आर्टीफिशीयल इंटेलिजिन्स (कृत्रिम बुद्धीमत्ता) वर विशेष कार्यशाळा घेण्यात आली. यात आपल्या क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते. ए.आय. म्हणजे काय, ते आपल्या दैनंदिन जीवनात कसे उपयोगी आहे. तसेच आरोग्य, सुरक्षा व मनोरंजन या विविध क्षेत्रावर त्याचा कसा वापर आणि उपयोग केला जातो यावर या कार्यशाळेत प्रशिक्षण देण्यात आले. यात गोदावरी इंजिनिअरींग कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ.विजय पाटील यांचे अमूल्य सहकार्य लाभले.






**✲ दि. १६ जानेवारी –** आर.सी.सी. ऑफ राईपची स्थापना या दिवशी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले व आर.सी.सी. कमिटी चेअरमन रो.ॲड.प्रविणचंद्र जंगले यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित सदस्यांना रो.डॉ.शुभदा कुलकर्णी यांनी शपथ दिली. अध्यक्षा पल्लवी शिंपी, मा.सचिव योगिता पाटील हे या क्लबचे पदाधिकारी आहेत.

**✲ दि. १८ जानेवारी –** वाचन कट्टा– रोटरी क्लब जळगाव आणि व.वा.जिल्हा वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ‘वाचन कट्टा’ हा उपक्रम दर महिन्यात दोन वेळा राबविला जातो. यावेळी उपस्थित नागरिक, विद्यार्थी पुस्तकांचे वाचन करीत असतात. यावेळेचा वाचन कट्टा असि.गव्हर्नर रो.डॉ.अर्पणा भट यांच्या प्रभाकर कला संगीत अकादमीत संपन्न झाला. सूर्य नमस्कार, श्राद्ध, कथक, कर्म–सिद्धांत, कायझन अशा अनेक विषयांवरील पुस्तकांचे वाचन करण्यात आले. वाचक, सदस्य मिळून २५ जण उपस्थित होते.



# प्रोजेक्ट

## जानेवारी महिन्यातील प्रोजेक्ट




**✻ दि. २० जानेवारी –** रोटरी क्लब जळगावच्या नुकत्याच स्थापन झालेल्या आर.सी.सी. राईप या क्लब तर्फे 'टिफिन रेसिपी' स्पर्धा आयोजित केली गेली. यातील महिला स्पर्धकांनी विविध प्रकारचे आरोग्यदायी, पौष्टिक व पारंपारीक पदार्थ करून आणले होते. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आर.सी.सी.राईपच्या अध्यक्षा पल्लवी शिंपी, मानद सचिव योगिता पाटील, प्रोजेक्ट चेअरमन मिनाक्षी सुतार यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी केला. सौ.हर्षाली चौधरी व सौ.मधुरा जहागीरदार यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. यात प्रथम सौ.स्नेहा सोनवणे, द्वितीय– सुनिता अनंत, तृतीय–मीनल रडे, उत्तेजनार्थ– कल्याणी वाटवे  हे विजेते स्पर्धक होत.




**✻ दि. ३० जानेवारी–** व्होकेशनल मंथच्या निमित्ताने एम.आय.डी.सी.मधील रो.प्रेम कोगटा यांच्या कोगटा इंपोर्ट एक्सपोर्ट या सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या व जळगावचे भूषण असलेल्या अग्रगण्य दाल मिल ला रोटरी क्लबच्या ९५ सदस्य व त्यांच्या कुटुंबियांनी मिळून भेट दिली. विविध प्रकारच्या डाळी कशा बनवल्या जातात, त्या स्वच्छ करणे, पॅकींग करणे हे सगळे आधुनिक तंत्रज्ञान वापरुन कसे केले जाते ते बघितले व त्याची माहिती मिळाली. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी रो.प्रेम कोगटा यांचा सत्कार करून क्लबचे वतीने आभार मानले.

## ज्ञानसागर - कॉन्फरन्स मधील सन्माननीय वक्ते



रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ-
# Peace-Building and Conflict Prevention : Rotary in Action

Rtn. Girish Kulkarni
(President, Rotary Club, Jalgaon)



The world today often appears reluctant to embrace peace or pursue harmony. Conflicts continue to arise from inequality, intolerance, injustice, and misunderstanding. True peace, however, cannot be fragmented or temporary. For peace to be meaningful and sustainable, it must be integral, inclusive, and comprehensive, addressing both visible conflicts and their underlying causes.

Peace-building begins with an international political order founded on equality, mutual trust, and cooperation. Rotary believes that dialogue and diplomacy, rather than confrontation, are essential for global security and justice. Through international partnerships and cross-border service initiatives, Rotary fosters understanding and trust among nations and communities.

Equally important is a balanced and inclusive global economic system. Poverty, unemployment, and economic disparity often lead to unrest and conflict. Rotary's projects in education, skill development, health care, and livelihood support directly address these inequalities, empowering communities and creating pathways to dignity and self-reliance.

Peace also flourishes in a culture that respects diversity and encourages dialogue. Rotary's global network brings together people of different cultures, professions, faiths, and generations. Through cultural exchanges, youth programs, and fellowship initiatives, Rotary helps dissolve historical prejudices and promotes friendship across borders.

Environmental sustainability is another vital dimension of peace. Ecological degradation and climate challenges are emerging sources of conflict. Rotary's growing focus on environmental protection reflects the belief that coexistence with nature and responsible stewardship are essential for shared prosperity and future peace.

Scientific and technological progress must also remain human-centric. Rotary supports innovation that enhances education, health, and social development, ensuring that technological advancements serve humanity and contribute to long-term well-being.

Finally, peace begins within individuals. A strong moral and ethical foundation nurtures harmony at home and in society. Rotary's core values and the Four-Way Test guide members to act with integrity, fairness, goodwill, and mutual respect in both personal and professional lives.

As Dr. A.P.J. Abdul Kalam so beautifully reminded the world, "Where there is righteousness in the heart, there is harmony in the home; when there is harmony in the home, there is peace in the world." Rotary carries this spirit of righteousness through service above self.

Let us continue to build peaceful lives, stronger communities, and a more harmonious world—together through Rotary.

# ज्ञानसागर

## डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स गोवा
## दि. २४ व २५ जानेवारी २०२६

### क्षणचित्रे






















## बॉलीवुड टाईम्स

### रजनी गंधा...

रो.सुबोध सराफ



कई बार यु ही देखा हैं ये जो मन की सीमा रेखा हैं ... मन दौड ने लगता हैं.... रजनीगंधा या बसू चटर्जी दिग्दर्शित चित्रपटातील एक सुरेख .. सुमधुर... लयबद्ध.. मेलोडियस गाणे.. गीतकार योगेश... चित्रपट कथेला साजेसे गाणे.. काय असू शकते याचे उत्तम उदाहरण... या गाण्याचे बोल ही तितकेच समर्पक... आणि नायक आणि नायिकेच्या तरल भावनांना प्रदर्शित करणारेच... आणि या गाण्याला संगीत, स्वरसाज चढवला आहे.. सलील चौधरी यांनी... एक आगळे वेगळे परंतु सिनेमाच्या जातकुळीला भावेल असेच संगीत या संगीतकाराने कायम दिलेले आहे .. हे गाणे सुद्धा अतिशय तन्मयतेने कंपोज केलेले आहे.. गायक मुकेश... या गाण्यातील मुकेश चा आवाज हा या गाण्याचा आत्मा आहे अगदी असेच म्हणावे लागेल कारण मुकेश चा नेहमीचा अनुनासिक आवाज या गाण्यात तुम्हाला आढळणार नाही ...अजून काही गाणी मुकेश ची आनंद या सिनेमातील ...या गाण्यांमध्ये ही अश्याच आवाजाची अनुभूती येते ..कारण सलील चौधरी यांनी मुकेश या गायकाला त्याच्या सहज सरल आवाजात गाऊन घेतले.. व ती सर्व गाणी अजरामर झालीत ... या गाण्याचे चित्रीकरण देखील तितकेच श्रेष्ठ... विद्या सिन्हा.. दिनेश ठाकूर... अमोल पालेकर या दिग्गजांचा अभिनयही उत्तमच... आणखी एक महत्वाचे या गाण्यासाठी मुकेशला राष्ट्रीय पारितोषिकाने गौरविले गेले....होते.... आणि हे गाणे अजरामर झाले... आणि हो सिनेमा देखिल....

रजनीगंधा.... अविस्मरणीय....

## गोल्डन वर्डस्

# Book Review

रो.पंकज व्यवहारे



**Title: Man's Search for Meaning**
**Author: Viktor E. Frankl**
**Type: non fiction**
**Publisher: Rider**
**Published in: 2010**

**Best quote in the book:** Man's deepest desire is to search for meaning and purpose.

***Review:***

Viktor Frankl's 'Man's Search for Meaning' is a profound exploration of finding purpose even in the most challenging circumstances. Based on his experiences as a Holocaust survivor, Frankl argues that the search for meaning is the primary motivation in human life. This book inspires you to find purpose in your life and to use that purpose as a source of strength and resilience. Frankl came to believe that man's deepest desire is to search for meaning and purpose. This outstanding work offers us all a way to transcend suffering and find significance in the art of living.

**About the author:**

Viktor Frankl, a prominent psychiatrist. He was from Vienna. Amidst the horrors of Auschwitz, in WWII he keenly observed the coping mechanisms adopted by both himself and fellow inmates. These several experiences is the collective efforts of his book Man's Search for meaning.

## यश, निवड, अभिनंदन

- डिस्ट्रीक्ट OCV सेक्रेटरी, पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके यांना एस.एम.बी.टी. इन्स्टिटट्युट, नाशिक तर्फे 'लाँग सर्व्हीस ॲवार्ड' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यांचे अभिनंदन!
- रोटरी क्लब अकोला नॉर्थ आयोजित '४६ दिवस चॅलेंज' या स्पर्धेत आपल्या क्लबच्या पुढील सदस्यांनी ४ सुवर्ण व २ रौप्य पदके पटकावलीत. रो.स्वाती ढाके (सुवर्ण), रो.ॲड.हेमंत भंगाळे (सुवर्ण), रो.डॉ.महेश पाटील (सुवर्ण), श्री.सागर अमळनेरकर (सुवर्ण), रो.ॲन.डॉ.साधना पाटील (रौप्य), रो.गिरीश कुलकर्णी (रौप्य). ह्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!
- नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या परेड मध्ये सांस्कृतिक मंत्रालयातर्फे 'वंदे मातरम' या संस्कृती दर्शनाच्या कार्यक्रमात अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांची कन्या कु.मृण्मयी हिने भाग घेतला होता. तिचे मन:पूर्वक अभिनंदन!
- रो.डॉ.सागर जावळे यांनी मुंबईला AMCON-2026 - Annual Medical Conference of The Association of Mumbai Consultants मध्ये '101 Indigeneous Medical Innovations Transforming Affordable Healthcare In India." या विषयावर की नोट स्पीकर म्हणून भाषण दिले. यावेळी डॉ.ए.वेलुमनी (A Billionaire Entrepreneur & Founder of Thyrocare Company यांनी डॉ.जावळे यांचे कौतुक केले आणि त्यांनी लावलेल्या अनेक नवीन शोधांमुळे प्रभावित होऊन त्यांच्या कंपनी बरोबर काम करण्याचे प्रस्तावही दिले. अभिनंदन!
- आपल्या बॉक्स क्रिकेट टिमने उत्कृष्ट कामगिरी करीत रोटरी क्लब गोल्ड सिटीने आयोजित केलेल्या बॉक्स क्रिकेट स्पर्धांमध्ये प्रि क्वार्टर फायनल पर्यंत मजल मारली. एका मॅच मध्ये रो.चंदन महाजन यांची 'मॅन ऑफ मॅच' म्हणून निवड झाली. अभिनंदन!
- Counsel Navi या संस्थेच्या इंटरनॅशनल करीअर अवेअरनेस या विषयावरील ऑनलाईन वेबीनार मध्ये रो.पंकज व्यवहारे यांची स्पीकर म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन !

## श्रद्धांजली



**रो.सुबोध सराफ आणि रो.डॉ.शमा सराफ यांचा मुलगा अर्णव (२६) याचे अमेरिकेत दि. १ जानेवारी २०२६ रोजी दु:खद निधन झाले. रोटरी क्लब जळगाव तर्फे त्यास भावपूर्ण श्रद्धांजली.**